

माजी पर्यावरण मंत्री रामदासभाई कदम वाढदिवस अभीष्टचिंतन विशेष!

पान ३,५,६,८,९,१०

शब्दांना सत्याची धार

# प्रहार

रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या प्रेरणेतून पाली ते साखरपा दरम्यान महामार्गावर भव्य सामूहिक वृक्षारोपण

पान २



रत्नागिरी ● सोमवार २७ जुलै, २०२६ RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३५१८० ● वर्ष २२ ● अंक २५८ ● पाने ८ ● ₹ ५.०० www.prahaar.in epaper.prahaar.in

# परीक्षा सुधारणांसाठी हायपॉवर टास्क फोर्स

## इन्फोसिसचे नंदन निलेकणी होणार अध्यक्ष

### पेपरफुटी रोखण्यासाठी कठोर कायदा आणणार - पंतप्रधान

**नवी दिल्ली:**

विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी सरकार सातत्याने पावले उचलत आहे. ज्या लोकांनी विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ केला, ते तुरुंगात सडत आहेत. आम्ही फास्ट ट्रॅक कोर्ट (जलदगती न्यायालये) स्थापन केली आहेत. आम्ही सोमवारी संसदेत कठोर शिक्षेसह तरतुदी आणत आहोत. पण आपल्याला भविष्याचाही विचार करायचा आहे. आपली परीक्षा प्रणाली विश्वासार्ह असावी, यात सर्वाधिक तंत्रज्ञानाचा वापर व्हावा. नंदन नीलेकणी यांच्या नेतृत्वाखाली एक उच्चाधिकार कार्यदल (हायपॉवर टास्क फोर्स) स्थापन करण्याचा

(पान २ वर)



### टास्क फोर्समध्ये दिग्गज तज्ज्ञांचा समावेश

ही टास्क फोर्स नॅशनल टेस्टिंग एजन्सी (NTA)च्या कामकाजाची पुनर्रचना आणि आढावा घेण्यासाठी काम करेल. तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करून परीक्षांची विश्वासार्हता कशी वाढवता येईल यासाठी विविध क्षेत्रांतील दिग्गजांना यात एकत्र आणण्यात आले आहे.

**टास्क फोर्समधील प्रमुख सदस्य**

नंदन निलेकणी (अध्यक्ष): इन्फोसिसचे सह-संस्थापक व युआयडीएआयचे माजी अध्यक्ष

(पान २ वर)

## प्रश्नपत्रिका फुटीविरोधी नवीन विधेयक लोकसभेत सादर होणार

### तपासासाठी दोन महिने अन् तीन महिन्यात सुनावणी पूर्ण

प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणावरून संसदेत निर्माण झालेला गतिरोध आता संपण्याची चिन्हे असून, आंदोलक विद्यार्थी आणि विरोधकांच्या प्रमुख मागणीनुसार केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर संसद उद्यापासून सुरळीत चालू होणे अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर, स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकार आणि पेपर लीक रोखण्यासाठी सरकार सोमवारी लोकसभेत 'सार्वजनिक परीक्षा (अन्यायकारक मार्ग प्रतिबंधक) संशोधन विधेयक, २०२६' सादर करणार आहे. हे विधेयक विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री जितेंद्र सिंह हे मांडणार असून, ते सादर झाल्यानंतर लगेचच मंजुरीसाठीही प्रस्ताव ठेवणार आहेत.

संघटित पेपर लीक प्रकरणात दोषी आढळणाऱ्या व्यक्ती, कोचिंग क्लासेस आणि सेवा पुरवठादारांसाठी वाढीव कारावास आणि भारी आर्थिक दंडाची तरतूद करण्यात आली आहे. खटले जलद गतीने चालवण्यासाठी राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेशांना विशेष सत्र न्यायालयांना 'विशेष फास्ट ट्रॅक न्यायालये' म्हणून घोषित करण्याचे अधिकार

(पान २ वर)

## मी मुंबईत आहे आणि महाराष्ट्रातच राहणार

### केंद्रात जाण्याच्या चर्चांना देवेंद्र फडणवीस यांचा पूर्णविराम

**नागपूर :**



केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी शनिवारी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे तत्काळ दिल्लीला रवाना झाले होते. त्यानंतर फडणवीस यांना केंद्रात मंत्रीपद मिळणार असल्याची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू होती. मात्र, आज माध्यमांशी बोलताना फडणवीस यांनी "मी मुंबईत आहे आणि महाराष्ट्रातच राहणार," असे स्पष्ट करत सुरू असलेल्या सर्व चर्चांना पूर्णविराम दिला आहे.

विद्यार्थ्यांचे प्रश्न हे कुठल्याही विशिष्ट व्यक्तीचे किंवा पक्षाचे नसतात, देशाचे हित सर्वात महत्त्वाचे असते. यासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पूर्ण संवेदनशीलता दाखवत सर्व आवश्यक निर्णय घेतले आहेत, असे फडणवीस म्हणाले. 'भारत विरुद्ध भाजप' असा संघर्ष सुरू झाल्याच्या उद्धव ठाकरे यांच्या वक्तव्यावर बोलताना फडणवीस म्हणाले की, उद्धव ठाकरे यांनी अशा प्रकारचे डायलॉग गेल्या दहा वर्षांत अनेकदा मारले आहेत, परंतु त्याचा कोणावर काहीही परिणाम होत नाही. देशातील जनता आणि भारत संपूर्णपणे पंतप्रधान मोदींच्या पाठीशी उभा आहे.

**कठोर कायद्याबद्दल पंतप्रधानांचे आभार**

पेपर लीक आणि परीक्षा गैरप्रकारांविरोधात देशामध्ये अत्यंत कडक कायदा आणण्याच्या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मनःपूर्वक आभार मानले.

**तरुणांचे भवितव्य सर्वोतोपरी**

पेपर लीकसारखे प्रश्न कोणत्याही एका राजकीय पक्षाशी संबंधित नसून ते थेट देशातील लाखो तरुणांच्या भविष्याशी जोडलेले आहेत. हे गांभीर्य लक्षात घेऊनच पंतप्रधान मोदींनी संवेदनशीलतेने देशाच्या हिताचे महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत, असे त्यांनी नमूद केले. जगभरात क्वचितच पाहायला मिळणारा असा अत्यंत कठोर कायदा परीक्षा गैरप्रकारांविरोधात आणण्याचा निर्णय सरकारने घेतला असून, सोमवारी संसदेत या विधेयकावर चर्चा होण्याची दाट शक्यता आहे.

## वेचक

### हूती बंडखोरांचा सौदी अरेबियाच्या रिफायनरीवर हल्ला

**तेल अवीव :** सौदी अरेबियाच्या जजान येथील प्रसिद्ध 'सौदी अरामको' तेल रिफायनरीवर बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांद्वारे भीषण हल्ला करण्यात आल्याचा दावा हूती बंडखोरांनी केला आहे. जजान ही सौदी अरेबियाची पाचवी सर्वात मोठी रिफायनरी असून, याद्वारे प्रतिदिन सुमारे चार लाख बॅरल कच्चे तेल प्रोसेस केले जाते. लाल समुद्राच्या किनाऱ्यावर वसलेली ही रिफायनरी सौदीच्या ऊर्जा आणि तेल निर्यातीच्या जाळ्यातील एक अत्यंत महत्त्वाचा भाग मानली जाते. सौदी अरेबियाने येमेनमधील हूती ठिकाणांवर (अलीकडेच) हवाई हल्ले केले होते. या लष्करी कारवाईचा वचपा काढण्यासाठीच आपण सौदीच्या ऊर्जा पायाभूत सुविधांना लक्ष्य केल्याचे बंडखोरांचे म्हणणे आहे.

(पान २ वर)

### टीटंबा आदिवासी आश्रमशाळेतील १०० हून अधिक विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा

**अमरावती :** मेळघाटातील धारणी तालुक्यातील टीटंबा येथील शासकीय पोस्ट बेसिक आदिवासी आश्रमशाळेत शनिवारी दुपारच्या जेवणानंतर विद्यार्थ्यांना अचानक उलट्या, मळमळ व पोटदुखीचा त्रास सुरू झाल्याने एकच खळबळ उडाली. प्राथमिक माहितीनुसार, शाळेतील १०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना अन्नविषबाधा झाल्याचा संशय असून सर्वांना तातडीने धारणी उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. सुदैवाने सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती सध्या धोक्याबाहेर असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, तहसीलदार प्रदीप शेवाळे आणि धारणी पोलीस ठाण्याचे ठाणेदार

(पान २ वर)

## कोणत्याही पदापेक्षा देश अन् विद्यार्थी महत्त्वाचे

### धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनाम्यावर अमित शाहांची प्रतिक्रिया

**नवी दिल्ली:**

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी 'नीट' प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणी निर्माण झालेल्या वाढत्या राजकीय व सामाजिक दबावानंतर आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. या महत्त्वपूर्ण घडामोडीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी प्रतिक्रिया देत, भाजपसाठी कोणत्याही राजकीय पदापेक्षा देश, देशवासीय, तरुण आणि विद्यार्थी सदैव प्रथम



स्थानी असल्याचे स्पष्ट केले आहे. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा याच नैतिक तत्त्वाचे एक उत्तम उदाहरण असल्याचे गृहमंत्री शाह यांनी म्हटले आहे.

शनिवारी २५ जुलै रोजी रात्री उशिरा सामाजिक माध्यम 'एक्स'वर पोस्ट करत गृहमंत्री अमित शाह यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली, "मोदी सरकार देशातील तरुणांच्या भावनांचा सदैव आदर करते. नीट परीक्षा आणि पेपरफुटीविरोधात ज्या काही कडक व आवश्यक सुधारणा

(पान २ वर)

## युवकांना स्वावलंबी बनवणे हे सरकारचे ध्येय

### 'व्हायब्रंट व्हिलेज' कार्यक्रमात पंतप्रधान मोदींचे प्रतिपादन

**नवी दिल्ली:**

'विकसित वायब्रंट व्हिलेज कार्यक्रम २०२६' च्या सहभागींसोबत रविवारी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधताना, देशातील प्रत्येक युवकाला आत्मविश्वासाने आणि स्वावलंबनाने पुढे जाण्यासाठी सक्षम करणे हे केंद्र सरकारचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अधोरेखित केले. या विशेष संवादादरम्यान पंतप्रधान मोदींनी सोलो ट्रॅव्हलिंगचे (एकट्याने प्रवास करणे) महत्त्व अत्यंत सविस्तरपणे मांडले. आजच्या तरुणाईमध्ये एकट्याने प्रवास करण्याचा ट्रेण्ड झपाट्याने वाढला असून, हा प्रवास केवळ जग पाहण्याचा मार्ग नसून स्वतःला शोधण्याचा आणि देश समजून घेण्याचा एक सर्वोत्तम व प्रभावी मार्ग आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

पंतप्रधान मोदींनी संवाद साधताना पुढे नमूद केले की, आज देशातील मुले आणि मुली मोठ्या आत्मविश्वासाने स्वतंत्रपणे बाहेर



पडत आहेत. तुम्ही सर्वजण जरी वेगवेगळे आणि स्वतंत्रपणे बाहेर पडलात, तरी संपूर्ण भारताच्या या व्यापक प्रवासाने आणि अनुभवाने तुम्हा सर्वांना एकाच कुटुंबासारखे घट्ट एकत्र जोडले आहे. एकट्याने केलेला हा प्रवास आपल्या देशातील तरुण पिढीच्या, विशेषतः भारताच्या लेकींच्या वाढत्या आत्मविश्वासाचे एक अत्यंत जिवंत आणि प्रेरक प्रतीक आहे. आमचे सरकार आणि प्रशासकीय यंत्रणांचे एकमेव ध्येय देशातील प्रत्येक तरुण आणि प्रत्येक लेकीला पूर्ण आत्मविश्वासाने आणि स्वावलंबनाने भविष्यात पुढे नेण्याचे आहे, असेही त्यांनी आवर्जून

(पान २ वर)

## भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात चार वर्षीय बालिका जखमी

### जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू

### लांजा सार्दळवाडी येथील घटना; पालकवर्गात भीतीचे वातावरण

**लांजा (प्रतिनिधी)**

भटक्या कुत्र्यांनी केलेल्या हल्ल्यात चार वर्षीय बालिका जखमी झाल्याची घटना रविवारी सकाळी १० वाजता लांजा शहरातील सार्दळवाडी येथे घडली. यामुळे पालकवर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून भटक्या कुत्र्यांचा प्रश्न पुन्हा एकदा



ऐरणीवर आला आहे.

याबाबत घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार लांजा शहरातील सार्दळवाडी येथील स्वम्भवी समीर तानवडे (वय ४ वर्षे) ही बालिका रविवारी सकाळी अंगणात असताना आठ ते दहा भटक्या कुत्र्यांनी अचानकपणे तिच्यावर हल्ला केला. यामुळे घाबरलेल्या त्या बालिकेने जोरजोरात रडण्यास सुरुवात केल्यानंतर पालक आणि शेजारीपाजारी धावत गेले. या कुत्र्यांच्या तावडीतून तिला वाचवण्यात आले. मात्र कुत्र्यांनी तिच्या पाठीवर अनेक ठिकाणी जखमा केल्या.

कुत्र्यांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या बालिकेला प्रथम लांजा ग्रामीण रुग्णालयात आणि त्यानंतर रत्नागिरी जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या घटनेप्रकरणी येथील सामाजिक कार्यकर्ते प्रसाद भाईशेट्ये यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

दरम्यान भटक्या कुत्र्यांनी केलेला या हल्ल्याच्या घटनेनंतर पालकवर्गात

(पान २ वर)

## इयत्ता चौथी, सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल जाहीर

### रत्नागिरी जिल्ह्याचा इयत्ता चौथीचा निकाल २८.९० तर सातवीचा निकाल २५.२९ टक्के

**रत्नागिरी (वार्ताहर):**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांनी २६ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या इयत्ता चौथी व सातवी शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतरिम निकाल जाहीर केला असून, रत्नागिरी जिल्ह्यातील निकालाची आकडेवारी समोर आली आहे. जिल्ह्यात इयत्ता चौथीमध्ये ८,७३९ विद्यार्थी परीक्षेला उपस्थित राहिले. त्यापैकी २,५२५ विद्यार्थी पात्र ठरले असून जिल्ह्याची पात्रता २८.९० टक्के इतकी नोंदविण्यात आली आहे. इयत्ता सातवीमध्ये ६,५०७ विद्यार्थी उपस्थित राहिले असून त्यापैकी १,६४५ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. सातवीचा पात्रता टक्का २५.२९ इतका आहे.

तालुकानिहाय निकालात इयत्ता चौथीत रत्नागिरी तालुक्याने ३६.२२ टक्के पात्रतेसह अव्वल कामगिरी केली. त्यानंतर लांजा (३४.७८ टक्के), राजापूर (३१.११ टक्के), खेड (२८.६० टक्के), चिपळूण (२८.१९ टक्के) आणि संगमेश्वर (२७.०१ टक्के) यांचा क्रमांक लागतो. गुहागर (२३.५१ टक्के), दापोली (२१.५० टक्के) तर मंडणगड (१२.९० टक्के) या तालुक्यांचा निकाल तुलनेने कमी राहिला.

इयत्ता सातवीच्या निकालातही

(पान २ वर)

## निवेंडी एमआयडीसीसाठी शासनाकडून ६० कोटींचा निधी प्राप्त

### आंबा, काजू तसेच कोकणातील इतर फळांवर आधारित प्रक्रिया उद्योगांना मिळणार प्राधान्य

**रत्नागिरी (वार्ताहर):**

रत्नागिरी तालुक्यातील निवेंडी येथे प्रस्तावित महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) वसाहतीच्या उभारणीला अखेर मोठी गती मिळाली आहे. गेल्या दोन वर्षांपासून निधीअभावी रखडलेल्या भूसंपादन प्रक्रियेसाठी राज्य शासनाने पहिल्या टप्प्यात ६० कोटी रुपयांचा निधी जिल्हा प्रशासनाकडे वर्ग केला असून, त्यामुळे बहुप्रतीक्षित निवेंडी एमआयडीसीचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

विधानसभा निवडणुकीपूर्वी निवेंडी येथे औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याची घोषणा करण्यात आली होती. त्यानंतर निवेंडी पंचक्रोशीत भूमापन पूर्ण करून सुमारे १०५ हेक्टर जागेच्या भूसंपादनाची

(पान २ वर)

## सावर्डे डेरवण फाट्यावर आयशर टेम्पोची ॲक्टिव्हाला जोरदार धडक, दुचाकीस्वार जखमी

**चिपळूण (प्रतिनिधी) :**

तालुक्यातील सावर्डे डेरवण फाटा येथे मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर रविवारी सायंकाळी भीषण अपघात झाला. आयशर टेम्पोने होंडा ॲक्टिव्हा दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकीस्वार जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, डेरवण फाटा येथे आयशर टेम्पोने

(पान २ वर)




## विद्यार्थ्यांचे श्रेय लाटणे म्हणजे 'बेगानी शादी में अब्दुल्ला दिवाना'

### एकनाथ शिंदे यांची उद्धव-राज, राहुल गांधींवर टीका

**मुंबई (प्रतिनिधी):**

दिल्लीतील जंतर-मंतरवरील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला यश मिळाल्यानंतर दादरमध्ये उबाठा आणि मनसेने केलेल्या जल्लोषावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी जोरदार प्रतिहल्ला चढवला. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा गैरवापर करून देशात आणि महाराष्ट्रामध्ये अराजकता निर्माण करण्याचा विरोधकांचा डाव जनतेने पूर्णपणे हाणून पाडला आहे, असा घणाघात त्यांनी केला. मुंबईतील नेस्को सेंटर येथील कार्यक्रमानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. विरोधकांचा समाचार घेताना शिंदे म्हणाले, 'विद्यार्थ्यांच्या मागण्या मान्य झाल्या, आंदोलन संपले, पण त्यावर राजकीय दुकान मांडणाऱ्यांचा हिरमोड झाला. बेगानी शादी में अब्दुल्ला दिवाना' अशी त्यांची अवस्था झाली आहे.

नीट पेपर लीक ही देशासाठी अत्यंत दुर्दैवी घटना होती, मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी क्षणाचाही विलंब न लावता विद्यार्थ्यांच्या भवितव्याला सर्वोच्च प्राधान्य दिले, असे सांगत शिंदे म्हणाले की, केंद्र सरकारने अत्यंत कठोर कायदा आणण्याचा निर्णय घेतला आहे. दोषींना १० वर्षांपर्यंतची सक्त



शिक्षा, १० कोटी रुपयांपर्यंतचा दंड, फास्ट ट्रॅक न्यायालयात खटले चालवणे आणि कोणालाही अभय न देणे, ही मोदी सरकारची अतिशय स्पष्ट भूमिका आहे. एनटीएमधील सुमारे ४७ संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली असून आरोपींना अटक करून सीबीआय चौकशी सुरू आहे. "कोणालाही सोडले जाणार नाही," असा स्पष्ट संदेश पंतप्रधान मोदींनी दिला आहे. तसेच, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिला, ही लोकशाहीतील अत्यंत जबाबदार भूमिका असल्याचे शिंदे यांनी नमूद केले.

**राहुल गांधींवर गंभीर आरोप**

राहुल गांधींवर टीका करताना शिंदे म्हणाले की, "आंदोलन जंतर-मंतरवर सुरू असताना पंतप्रधानांच्या निवासस्थानावर हजारो लोकांना घेऊन जाण्याचा नेमका उद्देश काय होता?" स्वर्गीय

(पान २ वर)

## तेज प्रताप यादव १४ दिवसांच्या न्यायिक कोठडीत

### बिहार बंद दरम्यान हिंसाचाराचा आरोप

**पाटणा :**

नीट पेपरफुटीच्या निषेधार्थ पुकारलेल्या 'बिहार बंद' आंदोलनादरम्यान झालेल्या हिंसाचाराप्रकरणी जनशक्ती जनता दल पक्षाचे अध्यक्ष तथा बिहारचे माजी मंत्री तेज प्रताप यादव यांना पाटणा न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. रविवारी पहाटे न्यायालयाने हा आदेश दिल्यानंतर त्यांना बेऊर (बियूर) मध्यवर्ती कारागृहात हलवण्यात आले.

माजी मुख्यमंत्री लालू प्रसाद आणि राबडी देवी यांचे ज्येष्ठ पुत्र असलेले तेज प्रताप यादव, नीट प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणी आयोजित 'बिहार बंद'च्या समर्थनार्थ गांधी मैदानाजवळ राम गुलाम चौकात निदर्शकांमध्ये सहभागी झाले होते.

शनिवारी दुपारी आंदोलनस्थळावरून त्यांना प्रथम प्रतिबंधात्मक कोठडीत घेण्यात आले

(पान २ वर)

## १८ वर्षांच्या अनाहत सिंगने रचला इतिहास

### ज्युनियर स्क्वॅश विश्व चॅम्पियनशिपचे विजेतेपद पटकावणारी ठरली पहिली भारतीय



**कॅनडा :**

भारताची युवा स्क्वॉशपटू अनाहत सिंग हिने कॅनडातल्या ओन्टॅरिओ येथे झालेल्या वर्ल्ड ज्युनियर चॅम्पियनशिपच्या अजिंक्यपदावर नाव कोरत ऐतिहासिक कामगिरी केली आहे. या प्रतिष्ठित स्पर्धेचे विजेतेपद पटकावणारी ती पहिली भारतीय स्क्वॉशपटू ठरली आहे.

अंतिम सामन्यात शीर्ष मानांकित आणि १८ वर्षांच्या अनाहतने द्वितीय मानांकित इजिप्तच्या रुकाया सालेमचा ११-३, ११-७, ११-९ असा सरळ सेट्समध्ये दणदणीत पराभव केला. या विजयासह तिने इजिप्तचे १५ वर्षांचे वर्चस्व संपुष्टात आणत थेट सुवर्णपदकाला गवसणी घातली आहे. सामना जिंकल्यानंतर स्क्वॅश टीव्हीशी बोलताना अनाहत म्हणाली, "मला अजूनही स्वप्नात आहे असंच वाटत आहे. ही स्पर्धा आतापर्यंत माझ्यासाठी दुःस्वप्न ठरली होती. २०२२ ते २०२४ दरम्यात क्वार्टर फायनलमध्ये पराभव पत्करावा लागला होता, तर गेल्या वर्षी सेमी फायनलमध्ये हार पत्करून कांस्य पदकावर समाधान मानावे लागले होते. या वर्षानंतर मला या स्पर्धेत खेळता येणार नव्हतं, त्यामुळे जेतेपद पटकावण्याची ही शेवटची संधी होती आणि मी ती साधली."

**दोन दशकांची प्रतीक्षा संपली**

२००५ मध्ये जोशना चिनप्पाने अंतिम फेरीत धडक मारली होती, जिथे तिचे विजेतेपद थोडक्यात हुकले होते. त्यानंतर तब्बल २१ वर्षांनी अंतिम फेरीत पोहोचणारी

(पान २ वर)